(8)

परवानगीवर्ष : २००९-१०
माध्यम : इंग्रजी
कायम विनाअनुदान

१४००२/२०१०
जा.क्र.माध्य-१(१२)प्रथम मान्यता/पुवि/२०१०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग,पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक 12 JUL 2010

प्रति,

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद पुणे

विषय : प्रथम मान्यता जून-२००९ पासून इ. ८ वीच्या वर्गास
(एक वर्षासाठी)

संदर्भ : १. आपले पत्र क्रमांक जिप/शिक्षण/माध्य/२८२/१० दि. ५/५/२०१०
२. शा.प.क्र.नवाशा-२००९/[१५२/२००९]/माशि-१ दि. २७/७/२००९
३. कार्यालयाचे पत्र क्र. माध्य-३/१२/नमाशा/पुवि/०९-१० दि.

वरील संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१,३,२ व ३.३ अन्वये दि पुना गुजराथी केळवणी मंडळ, कसबा पेठ, पुणे. संस्थेच्या दि पुना गुजराथी केळवणी मंडळाची इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा माध्यमिक शाळेच्या इयत्ता आठवी च्या वर्गास २००९-२०१० या शैक्षणिक वर्षासाठी जून २००९ पासून एक वर्षासाठी कायम विना अनुदान तत्वावर प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींची पूर्तता अधिन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटींची पुर्तता शाळा करीत आहे किंवा कसे ? याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव खालील अटी पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे ? याबाबतचे अहवाल प्रस्तावाबाबत पाठविण्यात यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तींची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करून घ्यावी. (मुला-मुलींसाठी)
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण उपसंचालक,पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडून मंजूर करून घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्यायावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचाऱ्यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.

PRINCIPAL
Dr. G.G. Shah Eng. Med. High School
1433, Kasba Peth, Pune-411011.

१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.

१३. तपासणी अहवालातील सूचनांची पूर्तता करावी.

१४. पालक शिक्षक संघाची स्थापना करावी.

१५. विद्यार्थ्यांसाठी संगणक सुविधा उपलब्ध करावी.

१६. विद्यार्थी संख्या वाढवावी.

१७. जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१४ एप्रिल २००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१. शाळांमध्ये सहा महिन्यांच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२. शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३. शाळेशी संबंधीत कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यात यावे.

४. सदर शाळेची इमारत सर्व दृष्टिकोनातून सुरक्षित असल्याची नॅशनल (National Building Code of India) अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देण्यापूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची राहील.

५. प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधीत अधिकारी यांनी हे काटेकोरपणे करावे. वरील बाब जे अधिकारी/कर्मचारी करणार नाहीत त्यांच्यावर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी...

संदर्भ - १. शासन पत्र क्रमांक -याचिका-२००९/(प्र.क्र.२४१)/प्राशि-४/

दि.१९ सप्टेंबर, २००९

२. संचालनालयाचे पत्र क्र. संकीर्ण २००९/१४११९/याचिका/१५क(८)

६३४४, दि.२४ सप्टेंबर, २००९

टीप : जनहितार्थ या-क्र. ४८३/०४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१४/०४/२००९ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधीत संस्थेने / शाळेने विहीत मुदतीत पुर्तता न केल्यास सदरचे आदेश आपोआप रद्द होतील याची नोंद घ्यावी.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

(शंकरराव सोपकर)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत: माहिती व कार्यवाही

मुख्याध्यापक
दि पुना गुजराथी केळवणी मंडळाची इंग्रजी माध्यमाची शाळा, पुणे.

..................... ..........

..................... ..........

निवडनस्ती

PRINCIPAL
Dr. G.G. Shah Eng. Med. High School